Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.X/Nov; 11pp.1-4

ISSN:-2230-7850

**Research Papers**

# अहमदनगर जिल्हयातील पीक रचनेतील बदलाचा अभ्यास (सन 2000 - 01 to 2009 - 10)

श्री. बाळु मारूती वाघमोडे
मु.पो. रेहेकुरी ता. कर्जत जि. अहमदनगर.

## प्रास्तविक

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिवर आधारित आहे. स्वातंत्र्यानंतर औद्योगिकीकरणावर भर दिला गेला. मात्र कृषिमध्ये समाधानकारक परिवर्तन घडवून आणले नाही. भारताच्या 32 .87 कोटी हेक्टर भूभागापैकी 14 .1 कोटी हेक्टर क्षेत्र निव्वळ लागवडीखाली असून जवळपास 65 टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कृषि क्षेत्रावर अवलंबून आहे. काही काळापूर्वी भारतात शेती ही 'जीवन जगण्याची पध्दती' होती. हरित क्रांतीनंतर भारतीय शेतीमध्ये सर्व पिकांच्या उत्पादनामध्ये शेतीच्या उत्पादकतेमध्ये आणि शेतकर्यांच्या उत्पन्नांमध्ये वाढ तर झालीच पण शिवाय आमुलाग्र बदल घडून आल्याचा दिसतो.

आर्थिक सुधरणांचा भारतीय शेतीवर परिणाम झाल्याचा दिसतो. भारतातील परंपरागत पध्दतीने शेती करणारा शेतकरी वर्ग आधुनिक शेतीकडे वळला आहे. याचे कारण म्हणजे शेतीच्या उत्पादकतेत वाढ करून निवडक शेती उत्पादनाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत नजर ठेवून किंमतीचा विचार करून अधिकाधिक उत्पन्न मिळविण्याच्या प्रेरणेने पिकांची निवड करू लागले ही एक महत्वाची उपलब्धी होय. त्यामुळे पिकांची रचना किंवा पिकांचा आकृतीबंध निरनिराळया देशांमध्ये राज्यांमध्ये एवढेच नव्हे तर विशिष्ठ राज्यांमधील वेगवेगळया प्रदेशांमध्ये जिल्हयामध्ये व तालुक्यांमध्ये वेगवेगळा असणे हे अत्यंत स्वाभाविक मानले पाहिजे. याचाच अर्थ पीक रचनेत झालेला बदल होय. भारतीय शेतकरी सन 1990 ' 91 नंतर परंपरागत अशा अन्नधान्याच्या पिकांकडून नगदी पिकांकडे झुकल्याचे दिसून येते.

देशात एकूण अन्नधान्य पिकांखालील क्षेत्राचे प्रमाण सन 1990' 91 मध्ये 68 .83 टक्के इतके होते तर 2005' 06 या वर्षी ते 63 .07 टक्यांपर्यंत कमी झाले. याच कालवधीत तेलबियांचे क्षेत्र 13 टक्यांवरून 14 .45 टक्यांपर्यंत वाढले. नगदी पिकांमध्ये ऊस व कापूस या प्रमुख पिकांच्या लागवडीखालील क्षेत्राचे प्रमाण अनुक्मे 1 .19 टक्क्यांवरून 2 .18 टक्के व 4 टक्क्यांवरून 4 .50 टक्क्यांवरून गेले. याच कालावधीमध्ये सिंचन क्षमतेमध्ये वाढ झालेली दिसून येते. सिंचन क्षमतेतील वाढीबरोबरच जमीन प्रकार जमीनीचा पोत पर्जन्याचे प्रमाण हवामान श्रमिकांचा पुरवठा तंत्रज्ञान भांडवल पुरवठा किंवा पतपुरवठा वाहतुक व दळणवळण सोयी जमिन कसण्याच्या पध्दती शेती मालाच्या किंमती प्रति हेक्टर सापेक्ष लाभ शेती आदानांची उपलब्धता सामाजिक घटक मानशिक घटक सरकारी धोरण आणि उपाय व सद्यस्थितीत ग्लोबल वॉर्मिंग इ. घटकातील ब्दलांचा भारतातील पीक रचनेवर परिणाम झाल्याचे दिसून येते.

या पार्श्वभूमीवर प्रस्तुत अध्ययनात अहमदनगर जिल्हयातील पीक रचनेतील बदलाचा अभ्यास केला आहे.

**अभ्यासाचे क्षेत्र ः**

अहमदनगर जिल्हा पश्चिम महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला असून क्षेत्रफळाच्या दृष्टिने महाराष्ट्रात प्रथम क्माकांवर असलेल्या या जिल्हयाचे क्षेत्रफळ 17 .413 चौ.कि.मी. आहे. ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या 5 .66 टक्के असून जिल्हयात एकूण चौदा तालुक्यांचा समावेश आहे. हे अभ्यासाचे भौगोलिक क्षेत्र आहे.

महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी उर्ध्व गोदावरी आणि भीमा या नद्यांच्या खोर्यात वसलेल्या अहमदनगर जिल्हयाचे उत्तर अक्षांश 18 .2 ते 19 .9 अंश व पूर्व रेखांश 73 .9 ते 75 .5 अंश असे भौगोलिक स्थान आहे. अहमदनगर जिल्हयाच्या उत्तरेस नाशिक ईशान्येस औरंगाबाद पुर्वेस बीड व उस्मानाबाद दक्षिणेस सोलापूर व पश्चिमेस ठाणे व पुणे जिल्हयांच्या सिमा आहेत.

जमिनीच्या उंच सखलपणानुसार जिल्हयाचे पश्चिमेकडील डोंगराळ भाग व पुर्वेकडील सखल भाग असे दोन विभाग पडतात. सहयाद्री पर्वताची रांग अकोले तालुक्यामधून जात असून सहयाद्रीचे सर्वोच्च शिखर कळसुबाई ह्य1654 मिटर उंचह याच पर्वतराजीमध्ये विराजमान आहे. जिल्हयाच्या गोदावरी व भीमा या मुख्य नद्या आहेत. प्रवरा ही गोदावरीची उपनदी नेवासा तालुक्यातील

Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.X/Nov; 2011

टोकाजवळ गोदावरी नदीस मिळते . मुळा ही प्रवरेची उपनदी जिल्हयाच्या उत्तर भागातून वाहते . पुणे जिल्हयातून वाहत येणारी भीमा नदी जिल्हयाच्या सरहद्दीवरून वाहते . सीना़ कुकडी व घोड या भीमा नदीच्या उपनद्या पारनेऱ श्रीगोंदा व कर्जत तालुक्यातून वाहतात .

अहमदनगर जिल्हयाचा भूस्तर ज्वालामुखीच्या लाव्हारसापासून तयार झालेला असून तो दख्खन टापू या नावाने ओळखला जातो . जिल्हयाच्या जमीनीचे साधारणपणे नदीकाठची पोयटयाची पांढरट जमीऩ डोंगर उतारावरची काळी दगड गोटे मिश्रीत जमीन आणि पांढरट चुनखडीयुक्त ह्यबरडहृ जमीन असे तीन भाग पडतात . जिल्हयाचे हवामान साधारणपणे उष्ण व कोरडे असून महाराष्ट्रात अहमदनगर जिल्हा प्रामुख्याने अवर्षण प्रवण क्षेत्र म्हणून ओळखला जातो . जिल्हयाचे पर्जन्यमान अनिश्चित स्वरूपाचे असून पर्जन्याची वाटणी असमान आहे . त्याचा परिणाम जिल्हयाच्या पीक रचनेवर झालेला दिसून येतो . अकोले व संगमनेर तालुक्यांच्या पश्चिम भागातील सरासरी पर्जन्यमान इतर तालुक्यांपेक्षा जास्त आहे . पण तेही नियमित नाही . सन **2008´ 09** मध्ये जिल्हयाचे सरासरी पर्जन्यमान **524** मि . मी . होते .

जिल्हयाचे एकूण भौगोलीक क्षेत्र **16 . 68** लक्ष हेक्टर असून त्यापैकी **7 . 9** टक्के वनक्षेत्र **7 . 5** टक्के पडीक जमीऩ **11 . 8** टक्के शेतीस उपलब्ध नसलेले क्षेत्र **4 . 7** टक्के पडीक जमीनी व्यतिरिक्त लागवड न केलेली जमीन तर **68 . 1** टक्के क्षेत्र लागवडीलायक उपलब्ध आहे . जिल्हयात खरिप़ रब्बी व उन्हाळी असे तीन कृषी उत्पादनांचे हंगाम प्रचलित आहेत . खरिप हंगामात बाजरी़ तांदूऴ नाचणी़ वरई ही धान्यपिके तर कुलीथ़ मठ़ हुलगा़ मूग ही कडधान्ये आणि भुईमूग व सूर्यफूल ही गळीताची पिके गेतली जातात . तांदूळ व नाचणी ही पिके बहुतांशी अकोले तालुक्यामध्ये घेतली जातात . रब्बी हंगामात ज्वारी़ गहू़ हरभरा ही पिके तर उन्हाळी हंगामात सामान्यपणे ज्याठिकाणी ओलिताची सोई अशा भागात भुईमूग़ मका़ सुर्यफूल़ भाजीपाला व चाऱ्याची पिके घेतली जात असल्याचे दिसुन येते .

**अभ्यास कालखंड §**

अहमदनगर जिल्हयातील पीक रचनेतील बदलांचा अभ्यास करण्यासाठी सन **2000´ 01** ते **2009´ 10** हा कालखंड विचारात घेण्यात आलेला आहे .

**अभ्यासाची उद्दिष्टये §**

प्रस्तुत अभ्यास करण्यासाठी खालील उद्दिष्टये ठेवण्यात आली .

1 . अहमदनगर जिल्हयाच्या पीक रचनेतील बदल तपासणे .

2 . अहमदनगर जिल्हयातील पीकांचे तालुकानिहाय क्षेत्र व त्यातील बदलांचा अभ्यास करणे .

**संशोधन पध्दती व विश्लेषण §**

प्रस्तुत अभ्यास हा दुय्यम साधनसामग्रीवर आधारलेला असून त्यासाठी अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचऩ अहमदनगर जिल्हा परिषद कृषी अहवाल़ जिल्हा व तालुका कृषी कार्यालय अहवाल़ महाराष्ट्राची आर्थिक पहाणी व कृषी सांख्यिकी विषयक माहिती महाराष्ट्र राज्य इ . दुय्यम स्त्रोतांचा उपयोग अभ्यासासाठी करण्यात आलेला आहे . या संकलित केलेल्या माहितीचे शास्त्रीय वर्गीकरण व सारणीयन करून अभ्यासासाठी प्रतिशत विश्लेषण पध्दतीचा वापर केलेला आहे .

अहमदनगर जिल्हयातील पीक रचनेतील बदलाचा अभ्यास ह्य**2000´ 01** ते **2009´ 10**हृ §

तक्ता क . 1 मध्ये अहमदनगर जिल्हयातील निरनिराळया तालुक्यांतील निरनिराळया पिकांखालील क्षेत्र दर्शवले आहे . सन **2000´ 01** ते **2009´ 10** या दहा वर्षाच्या कालखंडात एकूण अहमदनगर जिल्हयातील निरनिराळया पिकांखालील क्षेत्रांचे स्थूल लागडीखालील एकूण क्षेत्राशी असलेले शेकडा प्रमाण लक्षात घेतले असता असे दिसून येते की़

तांदूळ §

सन **2000´ 01** ते **2009´ 10** या कालखंडातील एकूण तांदूळ या पिकाखालील क्षेत्राचे निरिक्षण केले असता असे दिसून येते की़ सन **2000´ 01** साली लागवडीखालील एकूण क्षेत्राशी एकूण तांदूळ पिकाखालील क्षेत्राचे शेकडा प्रमाण **0 . 7** टक्के इतके होते तर **2009´ 10** मध्येही हे प्रमाण **0 . 7** टक्के इतके असल्याचे दिसून येते . यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ अथवा घट झाली नाही . कारम तांदूळ हे पीक जिल्हयातील अकोले तालुक्यातच मेठया प्रमाणात घेतले जात असून इतर तालुक्यांपेक्षा तेथे पावसाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते . असे जरी असले तरी अभ्यास कालखंडात अकोले या तालुक्यात देखील या पिकाखालील क्षेत्राच्या टक्केवारीमध्ये सुक्ष्म प्रमाणामध्ये घट झाल्याचे दिसून येते .

तक्ता क . 1 अहमदनगर जिल्हयातील तालुका निहाय निरनिराळया पिकाखालील क्षेत्र दर्शविणारा तक्ता ह्यक्षेत्र **'00'** हेक्टरहृ

**गहू §**

गहू पिकाखालील क्षेत्राच्या प्रवृत्तीचा अभ्यास केला असता अहमदनगर जिल्हयातील एकूण गहू या पिकाचे एकूण लगवडीखालील क्षेत्राशी असणारे शेकडा प्रमाण सन **2000´ 01** या वर्षी **6 . 8** टक्के इतके होते ते **2009 ´ 10** या वर्षी **9 . 7** टक्क्यांपर्यंत वाढल्याचे दिसून येते . म्हणजे यामध्ये दहा वर्षाच्या कालखंडात **2 . 9** टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते . यामध्ये शेवगांव व श्रीगोंदा या तालुक्यांचा अपवाद वगळता इतर तालुक्यांमध्ये पारनेर मध्ये हे प्रमाण स्थिर असून बाकी उर्वरित सर्व तालुक्यात या पिकाखालील क्षेत्राचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते . कारम गव्हाच्या सुधारित जाती निर्माण झाल्या . सिंचनाच्या सोयींची उपलब्धता वाढली . गव्हाच्या उत्पादनात वाढ झाली आणि शेतर्कयांना गव्हाची पुर्वीपेक्षा चांगली किंमत मिळू लागली व शेतर्कयांना गव्हाची योग्य किंमत देण्यासाठी सरकारने राबविलेल्या योजना या कारणांमुळे गव्हाच्या लागडीखाली असलेल्या शेतजमीनीच्या क्षेत्रांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते .

**ज्वारी §**

सन **2000´ 01** ते **2009´ 10** या कालखंडातील ज्वारी या पिकाखालील क्षेत्राचा अभ्यास केला असता असे दिसुन येते की़ सन **2000´ 01** या वर्षी एकूण लागडीखालील क्षेत्राशी या पिकाखालील क्षेत्राचे शेकडा प्रमाण **42 . 3** टक्के होते ते **2009´ 10** या वर्षी **35 . 4** टक्क्यांपर्यंत कमी झाले . म्हणजेच अभ्यास कालखंडात या पिकाखालील एकूण क्षेत्रामध्ये **6 . 9** टक्यांनी घट झाल्याचे दिसून येते . यामध्ये अकोले तालुक्यातील अल्प वाढीचा अपवाद वगळता बाकी उर्वरित सर्व तालुक्यांमध्ये या पिकाखालील क्षेत्रामध्ये घट झाल्याचे दिसून येते . या घटीचा परिणाम अल्प प्रमाणात गव्हाचे क्षेत्र वाढण्यावर झालेला दिसून येतो .

**बाजरी §**

बाजरी या पिकाखालील क्षेत्राचा सन **2000´ 01** ते **2009´ 10** या कालखंडात अभ्यास केला असता असे दिसुन येते की़ सन **2000´ 01** यावर्षी एकूण लागवडीखालील क्षेत्राशी या पिकाखालील क्षेत्राचे शेकडा प्रमाण **28 . 2** टक्के इतके होते ते **2009´ 10** यावर्षी **16 . 4** टक्क्यांपर्यंत कमी झाले . म्हणजेच अभ्यास कालखंडात **11 . 8** टक्क्यांनी घट झाल्याचे दिसून येते . ज्वारी या पिकाखालील क्षेत्रात झालेल्या घटीच्या प्रमाणापेक्षा बाजरी या पिकाखालील क्षेत्रात घट जास्त प्रमाणात झाल्याचे दिसते . यामध्ये कर्जत तालुक्याच्या अल्प प्रमाणातील ह्य**1 . 4** टक्केहृ वाढीचा उपवाद वगळता उर्वरित सर्व तालुक्यांमध्ये या अभ्यास कालखंडात घट झाल्याचे दिसून येते . याचाच अर्थ ज्वारी व बाजरी या पारंपारिक पिकांचे महत्व कमी होताना दिसून येत आहे .

**मका §**

मका या पिकाखालील क्षेत्राच्या प्रवृत्तीचा सन **2000´ 01** ते **2009´ 10** या कालखंडात अभ्यास केला असता असे दिसून येते की़ सन **2000´ 01** या साली एकूण लागवडी खालील क्षेत्राशी या पिकाखालील क्षेत्राचे प्रमाण **0 . 8** टक्के इतके होते ते **2009´ 10** या वर्षी **3 . 6** टक्क्यांपर्यंत वाढले . यावरून असे दिसते की़ अभ्यास कालखंडात या पिकाखालील क्षेत्रात **2 . 8** टक्क्यांनी

वाढ झाल्याचे दियून येते. यामध्ये जिल्हयातील सर्व तालुक्यांमध्ये या पिकाखालील क्षेत्राचे शेकडा प्रमाण वाढले असून कोपरगांग राहता श्रीरामपूर व राहुरी या तालुक्यांमध्ये या वाढीचे सरासरी शेकडा प्रमाण 7 टक्क्यांचे पुढे असल्याचे दिसून येते. याचे कारण या पिकासाठी उत्पादन खर्च कमी येत असून मजुरांची फारशी गरज भासत नाही.

**एकूण कडधान्ये ៖**

एकूण कडधान्य या पिकांखालील क्षेत्राचा सन 2000 01 ते 2009 10 या कालखंडात अभ्यास केला असता असे दिसून येते की सन 2000 01 यावर्षी एकूण लागवडीखालील क्षेत्राशी या पिकाखालील क्षेत्राचे शेकडा प्रमाण 5.2 टक्के इतके होते ते 2009 10 या वर्षापर्यंत 12.3 टक्के पर्यंत वाढले. म्हणजेच अभ्यास कालखंडात 7.1 टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते. यामध्ये शेवगांव तालुक्यातील एकूण कडधान्य पिकाखालील क्षेत्राच्या घटीचा अपवाद वगळता इतर सर्व तालुक्यात या पिकाखालील क्षेत्रात वाढ झाल्याचे दिसून येते. या वाढीमध्ये सर्वात जास्त वाटा जामखेड तालुक्याचा असलेला दिसून येतो. यावरून असे स्पष्ट होते की ज्वारी व बाजरी या पिकाखालील क्षेत्राच्या घटीचा परिणाम गहु मका व एकूण कडधान्यांच्या पिकांच्या वाढीवर झालेला दिसतो.

**एकूण अन्नधान्ये ៖**

एकूण अन्नधान्यांमध्ये तृणधान्ये व एकूण कडधान्यांचा समावेश असतो. एकूण अन्नधान्ये या पिकांखालील क्षेत्राचा सन 2000 01 ते 2009 10 या कालखंडात अभ्यास केला असता असे दिसुन येते की सन 2000 01 यावर्षी एकूण अन्नधान्ये पिकाखालील क्षेत्राचे एकूण लागवडीखालील क्षेत्राशी असणारे शेकडा प्रमाण 85.6 टक्के झाले होते ते 2009 10 यावर्षी 78.3 टक्क्यांपर्यंत कमी झाले. अभ्यास कालखंडात यामध्ये 7.3 टक्यांनी घट झाल्याचे दिसून येते. असे जरी असेल तरी एकूण पीक रचनेवर अन्नधान्यांच्या पिकांचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. श्रीरामपूर राहुरी व जामखेड तालुक्यात वाढ तर उर्वरित सर्व तालुक्यात घट झाल्याचे दिसते.

एकूण अन्नधान्यांच्या पिकाखालील क्षेत्रात घट होण्याची कारणे अशी सांगता येतील. ज्वारी बाजरी ही पिके पुर्वी लोकप्रिय होती. कमी कयशक्ती व निम्न जीवनमान जगणांया लोकांच्या आहारामध्ये हया पिकांना महत्वाचे स्थान होते. परंतु हिरव्या क्रांतीमुळे सरकारच्या धोरणांमुळे व बाजारपेठेमधील बदललेल्या परिस्थितीमुळे अन्नधान्यांचा लागवडीखालील असलेल्या क्षेत्रात जिल्हयातच नव्हे तर देशात सुध्दा घट होत गेली. गहू मका कडधान्य या पिकांच्या किंमतीमध्ये ज्या प्रमाणात वाढ होत गेली त्या प्रमाणात ज्वारी व बाजरी या पिकांच्या किंमतीत वाढ झाली नाही. ग्रामीण विभागात सर्वत्र अपुया प्रमाणात का होईना विजेची उपलब्धता सिंचनाचा विस्तार सुधारित जातींच्या वियाणांचा प्रसार व वाढलेल्या आकर्षणामुळे शेतकरी गहू मका नगदी पिकांच्या शेतीकडे वळले. लोकांचे उत्पन्न जस जसे वाढले त्यांच्या कयशक्तीमध्ये जस जशी वाढ झाली. आपले जीवनमान उंचावण्याची त्यांची प्रेरणा जसजशी प्रबळ झाली तसतशी लोकांची ज्वारी व बाजरी या धान्यांची गरज कमी कमी होत गेली आणि या दोन पिकांच्या घटीचा परिणाम एकूण अन्नधान्येच्या घटीवर जास्त प्रमाणात झाल्याचा पहावयास मिळतो.

**एकूण तेलबिया ៖**

एकूण तेलबिया या पिकाखालील असणांया क्षेत्राचा सन 2000 01 ते 2009 10 या कालखंडात अभ्यास केला असता असे दिसून येते की सन 2000 01 या साली या पिकाखाली असणांया क्षेत्राचे एकूण लागवडीखालील क्षेत्राशी असणारे शेकडा प्रमाण 4.8 टक्के इतके होते ते 2009 10 मध्ये 2.2 टक्क्यांपर्यंत कमी झाले. अभ्यास कालखंडात यामध्ये 2.6 टक्क्यांनी घट झाल्याचे दिसून आले. यामध्ये पारनेर तालुक्यातील सुक्षम वाढीचा अपवाद वगळता बाकी सर्व तालुक्यात घट झाल्याचे दिसुन येते.

**ऊस ៖**

ऊस या पिकाखालील क्षेत्राच्या प्रवृत्तीचा सन 2000 01 ते 2009 10 या कालखंडात अभ्यास केला असता असे दिसुन येते की सन 2000 01 यावर्षी या नगदी पिकाखालील क्षेत्राचे एकूण लागवडीखालील क्षेत्राशी असणारे शेकडा प्रमाण 6.3 टक्के इतके होते ते 2009 10 मध्ये 5.8 टक्क्यांपर्यंत कमी झाले. अभ्यास कालखंडात यामध्ये अतिसुक्ष्म प्रमाणात 0.5 टक्क्यांनी घट झाल्याचे दिसून येते. म्हणजेच हे क्षेत्र जवळजवळ स्थिर राहिल्याचे दिसते. यामध्ये श्रीरामपूर नेवासा पाथर्डी व राहता या तालुक्यांमध्ये या नगदी पिकाखालील क्षेत्रात अल्प प्रमाणातील घटीचा अपवाद वगळता इतर सर्व तालुक्यात ऊस पिकाखालील क्षेत्रात वाढ झाल्याचे दिसुन येते.

या नगदी पिकाखालील क्षेत्रात जरी सुक्ष्म प्रमाणात घट झाली असली तरी जिल्हयाचे हे प्रमुख व्यापारी पिक मानले जाते. सहकारी व खाजगी साखर कारखान्यांची धोरणे मजुर टंचाई मशागत खर्च ऊस तोडणी मजुर अडचणी विजेची उपलब्धता इ. कारणांमुळे या पिकाखालील क्षेत्रात वाढ होत नसल्याचे दिसते.

**कापूस ៖**

कापूस हे जिल्हयाचे दुसरे नगदी किंवा व्यापारी पिक असून सन 2000 01 ते 2009 10 या कालखंडात या पिकाखालील क्षेत्राचा अभ्यास केला असता असे दिसून येते की सन 2000 01 यावर्षी या पिकाखालील क्षेत्राचे एकूण लागवडीखालील क्षेत्राशी असणारे शेकडा प्रमाण 04. टक्के इतके होते ते 2009 10 मध्ये 8.6 टक्क्यांपर्यंत वाढले. अभ्यास कालखंडात यामध्ये 8.2 टक्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते. ही वाढ मोठया प्रमाणात असल्याचे दिसते. यामध्ये जिल्हयातील सर्वच तालुक्यांमध्ये या पिकाखालील क्षेत्रात वाढ झाली असून सर्वात जास्त या वाढीमध्ये वाटा शेवगांव तालुक्याचा असल्याचे दिसून येते. अन्नधान्यांच्या पिकाखालील क्षेत्राच्या घटीचा परिणाम कापूस भाजीपाला ऊस व इतर नगदी पिकांखालील क्षेत्र वाढीवर झाल्याचा दिसतो. याचाच अर्थ जिल्हयातील शेती उत्पादक नगदी पिके मोठया प्रमाणात घेवू लागले आहेत.

**सारांश**

एकंदरीत अहमदनगर जिल्हयात काही तृणधान्ये व कडधान्यांमध्ये वाढ होत असली तरी एकूण अन्नधान्ये व गळीताची धान्ये या पिकाखालील क्षेत्राचे प्रमाण घटले आहे व कापूस सोयाबीन या नगदी पिकाखालील क्षेत्राचे प्रमाण वाढले आहे. तर ऊस या पिकाखालील क्षेत्राच्या प्रमाण वाढले आहे. तर ऊस या पिकाखालील क्षेत्राच्या प्रमाणात सिमांत गट झाल्याचे निदर्शनास येते. म्हणजेच अहमदनगर जिल्हयातील शेतकरी वर्गाचा कल नगदी पिके घेण्याकडे झुकल्याचे स्पष्ट होते.

**संदर्भ ៖**

1. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा सन 2000 01 ते 2009 10.
2. जिल्हा कृषी विभाग अहवाल जिल्हा परिषद अहमदनगर सन 2000 01 ते 2009 10.
3. तालुका कृषी कार्यालयांकडून संकलित केलेली माहिती सन 2000 01 ते 2009 10.
4. महाराष्ट्राची पाहणी अहवाल सन 2009 10.